आयुक्त दुग्धव्यवसाय विकास यांचे कार्यालय,
महाराष्ट्र राज्य,
प्रशासकीय इमारत,
अब्दुल गफारखान मार्ग,
वरळी सीफेस, मुंबई-४०० ०१८

**दूरध्वनी** :०२२- २४९३७०६४ FAX : ०२२-२४९३ ७२०८ email - dyddcadmin@gmail.com

सं.क्र.आदुवि-१५(७)/अधिक्षक (राज्य)/जे.सू./प्र.क्र.१२/२०१६/ १८३८

22 MAR 2016

**विषय :-** दुग्धव्यवसाय विकास विभागातील प्रशासन गटातील अधिक्षक संवर्गातील राज्यस्तरीय कर्मचा-यांची दि.०१.०१.२०१६ ची स्थिती दर्शविणारी प्रारुप जेष्ठता सूची.

**संदर्भ :-** आदुवि-१५(८)/अधिक्षक (राज्य)/जे.सू./प्र.क्र.३१/२०१५/६६०७, दि.१६.१०.२०१५

**परिपत्रक :-**

दुग्धव्यवसाय विकास विभागातील प्रशासन गटातील अधिक्षक संवर्गातील राज्यस्तरीय कर्मचा-यांची दि.०१.०१.२०१६ ची स्थिती दर्शविणारी प्रारुप जेष्ठता सूची सोबत जोडली आहे.

२. सर्व संबंधीत अधिकारी / कार्यालय प्रमुख यांना विनंती करण्यांत येते की, त्यांनी सोबतची प्रारुप जेष्ठता सूची संबंधित कर्मचा-यांच्या नजरेस आणावी व त्यामधील तपशिलाबाबत जर कोणाचे काही आक्षेप असतील तर अशा सर्व कर्मचा-यांची अभिवेदने सविस्तर अभिप्रायासह जेष्ठता सूची निर्गमित झाल्यापासून २० दिवसांचे आत खात्यास सादर करावीत.

३. सर्व प्रादेशिक प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांना सूचित करण्यांत येते की, आपल्या अधिपत्त्याखालील कर्मचा-यांच्या तपशिलाची सेवापुस्तक व अन्य उपलब्ध अभिलेख्यावरुन पडताळणी करुन ज्येष्ठता सूचीत काही त्रूटी असतील तर त्या दुरुस्त करण्यासाठी एकत्रित माहिती/ तपशिल पाठविण्यांत यावा. तसेच त्यांच्या नियंत्रणाखालील एखाद्या कर्मचा-यांचे नाव जेष्ठता सूचीत अंतर्भूत करावयाचे राहून गेल्याचे आढळून आल्यास सदर कर्मचा-याची सेवा तपशिलासह माहिती पाठविण्यांत यावी. तसेच जेष्ठता सूचीतील रिक्त रकान्यांचा तपशिल २० दिवसांचे आत पाठविण्यात यावा. २० दिवसांच्या नंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार करण्यात येणार नाही. आणि कोणतीही माहिती न आल्यास विभागातील संबंधितांचा काहीही आक्षेप नाही असे गृहीत धरुन जेष्ठता सूची अंतिम करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

(कृ.मा.प.)

SpState

४.   सदर परिपत्रक दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले आहे. सदर जेष्ठता सूचीची प्रत वेबसाईटवरुन प्राप्त करुन घ्यावी. आपल्या अधिपत्त्याखालील सर्व संबंधितांना जेष्ठता सूचीची प्रत वेबसाईटवरुन उपलब्ध करुन घेण्याबाबत कळवावे.

उप आयुक्त (प्रशासन)
दुग्धव्यवसाय विकास विभाग

प्रति,
महाव्यवस्थापक, बृहनमुंबई दूध योजना, वरळी
प्रभारी व्यवस्थापक, आरे/वरळी/कुर्ला
प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/नागपूर/अमरावती
मुख्य कार्यकारी अधिकारी, आरे
नियंत्रक, गुरे नियंत्रण, गोरेगाव
प्राचार्य, दुग्धशाळा विज्ञान संस्था, आरे
प्रकल्प अधिकारी, दुग्ध प्रकल्प, दापचरी
व्यवस्थापक, पशुपैदास व संगोपन केंद्र, पालघर
कार्यासन-१५(२)/१५(३)/१५(९)/२०,आदुवि कार्यालय
निवड नस्ती

**प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी-**
श्री.वाळके, दुग्धशाळा पर्यवेक्षक
यांना कळविण्यांत येते की, सदरची जेष्ठता सूची वेबसाईटवर प्रसिध्द करण्यांत यावी.